पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ७

**सभावृत्तांत**

दिनांक - **१८/०७/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **१८/०७/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.सुनिता हेमंत तापकीर - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे - उपसभापती
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
५. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
६. मा.सुलक्षणा राजू धर
७. मा.कदम निकीता अर्जुन
८. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.आष्टीकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.आवारी – प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.डॉ.डांगे – महिला वैद्यकीय अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्य यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२)बालवाडयांतील मुलांना सकस आहार व खेळणी देणेबाबत – मा.योगिता नागरगोजे, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) मनपाच्या बालवाडयांमधील मुलांना स्वच्छता कीट देणेबाबत – मा.सुलक्षणा धर, मा.सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०४/०७/२०१७ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ०६)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - १० विषय क्रमांक - ०१

दिनांक - १८/०७/२०१७

सुचक : मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.सागर आंगोळकर

संदर्भ : मा.योगिता नागरगोजे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव –

विषय – महिला बचत गटातील इतर महिलांना व्यवसाय प्रशिक्षण उपलब्ध करुन देणेबाबत –

विषय क्रमांक ०१ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामाकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १८/०७/२०१७

सुचक : मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.वैशाली घोडेकर

संदर्भ : मा.योगिता नागरगोजे, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव –

अंगणवाडीतील मुलांना ज्याप्रमाणे सकस आहार देण्यात येतो त्याच धर्तीवर व त्याच दिवशी पिंपरी चिंचवड मनपाच्या बालवाडयांमधील मुलांना प्राथमिक शिक्षण विभागामार्फत पोषक आहार देणे व विविध प्रकारची खेळणी देणे या योजनांची कार्यवाही करणेस तसेच याकामी आवश्यक असणारी खर्चाची तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला बाल कल्याण योजने अंतर्गत निश्चित करणेत आलेल्या लेखाशिर्षातून करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १८/०७/२०१७

सुचक : मा.सुलक्षणा धर अनुमोदक : मा.सोनाली गव्हाणे

संदर्भ : मा.सुलक्षणा धर, मा.सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालवाडयांमधील शिशू / बालकांना स्वच्छता कीट देण्यास व त्याकामी येणा-या खर्चाची तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील जननी

शिशू सुरक्षा कार्यक्रम या लेखाशिर्षातून करण्यास मान्यता देणेत येत आहे. याबाबत वैद्यकीय विभागाकडून या कीटमधील साहित्य ठरविण्यास तसेच सदरची खरेदी भांडार विभागा कडून करणेस व याबाबतची प्रशासकीय कार्यवाही व साहित्य वाटप कार्यवाही प्राथमिक शिक्षण विभागाकडून करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुनिता हेमंत तापकीर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९७९/२०१७
दिनांक : १९/०७/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.